**राज्यातील इमारत व इतर बांधकाम क्षेत्रातील कामगारांसाठी "प्रधानमंत्री आवास योजने" अंतर्गत महाराष्ट्र बांधकाम कामगार आवास योजना राबविण्याबाबत.....**

**महाराष्ट्र शासन**
**गृहनिर्माण विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः प्रआयो/२०१७/प्र.क्र.१०८/गृनिधो-२**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ३२.
दिनांक: ०३ फेब्रुवारी, २०१८.

**वाचा -**

१) शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग क्रमांकः प्रआयो-२०१५/प्र.क्र.११०/गृनिधो-२, दि. ०९.१२.२०१५
२) शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग क्रमांकः प्रआयो-२०१५/प्र.क्र.११०/गृनिधो-२, दि. ३०.०५.२०१७
३) शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग क्रमांकः प्रआयो-२०१५/प्र.क्र.११०/गृनिधो-२, दि. १३.०६.२०१७
४) शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग क्रमांकः प्रआयो-२०१५/प्र.क्र.२१७/गृनिधो-२, दि. ०९.११.२०१७

**प्रस्तावना -**

देशातील प्रत्येक कुटुंबाला हक्काचे घर उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने केंद्र सरकारने जून, २०१५ मध्ये सर्वांसाठी धरे या संकल्पनेवर आधारीत प्रधानमंत्री आवास योजना सुरु केलेली आहे. सदर योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार या योजनेची राज्यात अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने राज्य मंत्रिमंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार संदर्भ क्र. १ अन्वये शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. याशिवाय या योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने सदर शासन निर्णयान्वये मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली "राज्यस्तरीय मंजुरी व संनियंत्रण समिती" (SLSMC) गठीत करण्यात आलेली आहे. तद्नंतर संदर्भ क्र. ३ च्या शासन निर्णयान्वये सुकाणू अभिकरणास अभियान संचालनालय म्हणून घोषीत करण्यात आलेले असून उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांची संचालक, राज्य अभियान संचालनालय म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. याशिवाय संदर्भ क्र. ४ च्या शासन निर्णयान्वये, प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत नगरपालिका / नगर पंचायतीच्या प्रस्तावांकरीता नगर विकास विभागाच्या अधिपत्याखालील नगरपालिका प्रशासन संचालनालयास (DMA) सुकाणू अभिकरण म्हणून घोषीत करण्यात आलेले असून संचालक, नगरपालिका प्रशासन यांची राज्यस्तरीय मान्यता व संनियंत्रण समिती (SLSMC) तसेच राज्यस्तरीय मूल्यमापन समितीमध्ये (SLAC) सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. राज्यात सन २०२२ पर्यंत १९.४० लक्ष घरकुलांच्या बांधणीचे उद्दिष्ट आहे.

सद्य:स्थितीत राज्यातील ३८२ शहरांमध्ये प्रधानमंत्री आवास योजना राबविण्यास केंद्र सरकारने मान्यता दिलेली आहे. बांधकाम क्षेत्र हे देशातील जनतेला मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध करुन देणारे क्षेत्र आहे. तथापि, या क्षेत्रातील कामगार हे विखुरलेले व असंघटीत आहेत. सदर कामगारांना राहण्यासाठी तसेच अन्य पायाभूत सोयीसुविधा उपलब्ध नाहीत. त्यामुळे अशा पक्के घर नसलेल्या व महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे नोंदणी केलेल्या कामगारांना प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत महाराष्ट्र बांधकाम कामगार आवास योजनेव्दारे पाणी, रस्ते, वीज, शौचालये व मलनि:सारण इ. पायाभूत सुविधा असलेली घरकुले उपलब्ध करुन देण्यासाठी शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय -**

महाराष्ट्र बांधकाम कामगार आवास योजना ही बांधकाम क्षेत्रातील नोंदणीकृत कामगारांकरीता विशेष योजना म्हणून प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग दिनांक ०९.१२.२०१५ अन्वये राबविण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. सदर योजनेचे लाभ प्रधानमंत्री आवास योजनेतील पात्रतेचे निकष पूर्ण करणाऱ्या महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदणीकृत बांधकाम कामगारांना तसेच अशा कामगारांच्या पात्र गृहप्रकल्पांना देण्यात येतील. सदर कामगारांच्या पात्रता निश्चिती संदर्भातील कार्यवाही करण्याची जबाबदारी संबंधित मंडळ व कामगार विभागाची राहील. कामगार विभागाकडून निश्चित करण्यात आलेल्या पात्र लाभार्थ्यांना व गृहप्रकल्पांना संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयानुसार तसेच राज्यशासनामार्फत वेळोवेळी प्रधानमंत्री आवास योजनेकरीता लागू केलेल्या सवलती देण्यात येतील, त्याशिवाय पात्र लाभार्थ्यांना महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळाकडून प्रती लाभार्थी रु. २ लक्ष इतके अतिरिक्त अनुदान देण्यास कामगार विभागाकडून मान्यता देण्यात आली आहे. तसेच म्हाडास अनुज्ञेय असलेला २.५ चटई क्षेत्रफळ निर्देशांक (FSI) महाराष्ट्र बांधकाम कामगार आवास योजनेअंतर्गत पात्र गृहप्रकल्पांना अनुज्ञेय करण्यात येत आहे. सदरचा चटईक्षेत्र निर्देशांक केवळ १००% आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठीच्या घरकुलांच्या प्रकल्पांना व प्रधानमंत्री आवास योजनेच्या विहित कालावधीकरीता असेल.

बांधकाम कामगार हा लाभार्थी म्हणून खालील अटींची पूर्तता करणे आवश्यक राहील :-

१. महाराष्ट्र बांधकाम कामगार आवास योजनेंतर्गत लाभास पात्र असणारा गृहनिर्माण प्रकल्प, महारेरा अधिनियम २०१६ अंतर्गत नोंदणीकृत असावा.

२. लाभार्थी कामगार हा महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे नोंदणीकृत व योजनेंतर्गत पात्र असावा.

३. वरील दोन (२) प्रमाणे पात्र कामगार, अट क्रमांक एक (१) प्रमाणे नोंदणीकृत कोणत्याही प्रकल्पातील घरकुल योजनेत सहभागी झाल्यास महाराष्ट्र बांधकाम कामगार आवास योजनेअंतर्गत महाराष्ट्र इमारत व इमारत बांधकाम कल्याणकारी मंडळाकडून देय प्रती लाभार्थी रु. २ लक्ष इतके अनुदानास पात्र राहील

सदरचा शासन निर्णय कामगार विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.८३/२०१७ दि.११.०१.२०१८ ला अनुसरुन कामगार विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२०३१३३९२७८८०९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramchandra Dhanawade

Digitally signed by Ramchandra Dhanawade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Housing Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=cf4fd1e4249e6612552db1552e149b0688899cac7ec c37ca9fbf60ec7d9103d6, cn=Ramchandra Dhanawade
Date: 2018.02.03 17:32:41 +05'30'

**(रा.कों. धनावडे)**

उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन (पत्राने),

२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
३. मा. मंत्री (गृहनिर्माण) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
४. मा. राज्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
५. मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा, म.वि.स., विधानभवन, मुंबई.
६. मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद, म.वि.स., मुंबई.
७. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२.
८. उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
९. व्यवस्थापकीय संचालक, शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
१०. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
११. मुख्य कार्यकारी अधिकारी, धारावी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
१२. संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई.
१३. आयुक्त, कामगार कल्याण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१४. सचिव, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळ, मुंबई.
१५. निवडनस्ती/गृनिधो-२ कार्यासन, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.